**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

केंद्रीय कापूस संशोधन संस्था

नागपूर

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 08-09-2026**

**नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2026-09-08 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2026-09-09 | 2026-09-10 | 2026-09-11 | 2026-09-12 | 2026-09-13 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 9.8 | 8.4 | 26.6 | 34.6 | 38.5 |
| कमाल तापमान (अं.से) | 34.5 | 34.6 | 34.7 | 34.8 | 34.9 |
| किमान तापमान (अं.से) | 23.0 | 23.1 | 23.2 | 23.4 | 23.5 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 91 | 90 | 88 | 89 | 92 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 62 | 60 | 61 | 62 | 69 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11 | 12 | 12 | 12 | 8 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 284 | 300 | 311 | 321 | 332 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 1 | 3 | 7 | 7 | 7 |
| चेतावणी | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल |

## भविष्यवाणी सारांश:

• नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय अंदाजानुसार, पुढील ५ दिवसा दरम्यान आकाश आंशिक ढगाळ ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक ०८, ०९, १० आणि ११ सप्टेंबर २०२६ रोजी काही ठिकाणी (विखुरलेल्या स्वरूपाचा) हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक १२ सप्टेंबर २०२६ रोजी सर्वत्र ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

• दिनांक ११ व १२ सप्टेंबर २०२६ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

• मेघगर्जना व विजांच्या कडकडाटामुळे शेतकरी, शेतमजूर तसेच पशुधनाला दुखापत होण्याची किंवा जीवितहानी होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती किंवा खुल्या बाजारात विक्रीसाठी आणलेला शेतमाल भिजून त्याची गुणवत्ता खराब होऊ शकते.

## कृषि सल्ला:

• कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे स्थानिक शांत व स्वच्छ हवामान परिस्थिती असताना पुढील ३ दिवस सुरु ठेवावी. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे स्थानिक शांत व स्वच्छ हवामान परिस्थिती असताना पुढील ३ दिवस सुरु ठेवावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मका | • मका पिकातील लष्करी अळी या किडीच्या व्यवस्थापनाकरिता कोणत्याही एका कीटकनाशकाची जसे कि, क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल ९.३ टक्के प्रवाही + लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ४.६ टक्के झेडसी प्रवाही ५ मिली किंवा स्पिनेटोराम ११.७ टक्के एससी प्रवाही, ५.१२ मिली किंवा क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल १८.५ टक्के प्रवाही एससी ४.३२ मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी, ८ ग्रॅम किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के + लुफेन्युरॉन ४० टक्के डब्ल्यूजी, १.६ ग्रॅम किंवा थायोडिकार्ब ७५ टक्के डब्ल्यूपी, २० ग्रॅम किंवा नोव्हाल्युरॉन ५.२५ टक्के + इमामेक्टीन बेन्झोएट ०.९ टक्के प्रवाही एससी, २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | • सोयाबीन पिकातील पिवळा मोझेक विषाणू/सोयाबीन मोझेक विषाणू या रोगांच्या नियंत्रणासाठी, प्रादुर्भाव ग्रस्त झाडे मुळासकट उपटून नष्ट करावी. याव्यतिरिक्त, थियामेथॉक्सम + लॅम्डा सायहॅलोथ्रिन (१२५ मिली/हेक्टर) किंवा बीटासायफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड (३५० मिली/हेक्टर) किंवा ॲसिटामिप्रिड २५ % + बायफेंथ्रिन २५% डब्ल्यूजी (२५० ग्रॅम/हेक्टर) यांसारख्या शिफारस केलेल्या पूर्व-मिश्रित कीटकनाशकांपैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.. यामुळे खोडमाशीच्या नियंत्रणास देखील मदत होईल. पिवळा मोझेक विषाणू/सोयाबीन मोझेक विषाणू या रोगाचा वाहक असलेल्या पांढऱ्या माश्यांना आकर्षित करण्यासाठी सोयाबीन पिकामध्ये पिवळे चिकट सापळे लावावे. (आयआयएसआर- इंदोर शिफारस). • सोयाबीन पिकातील उंट अळीच्या नियंत्रणासाठी, क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल १८.५% SC – १५० मि.ली. प्रती हेक्टर, किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०१.९०% EC – ४२५ मि.ली. प्रती हेक्टर किंवा फ्लुबेंडीअमाइड २०% WG – २५०–३०० ग्रॅम प्रती हेक्टर किंवा फ्लुबेंडीअमाइड ३९.३५% w/w SC – १५० मि.ली. प्रती हेक्टर किंवा इंडोक्साकार्ब १५.८०% EC – ३३३ मि.ली. प्रती हेक्टर किंवा लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रीन ०४.९०% CS – ३०० मि.ली. प्रती हेक्टर किंवा प्रोफेनोफॉस ५०% EC – १ लिटर/हेक्टर किंवा नोव्हाल्युरॉन + इंडोक्साकार्ब ०४.५०% SC – ८२५–८७५ मि.ली. प्रती हेक्टर किंवा क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल ०९.३०% + लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रीन ०४.६०% ZC – २०० मि.ली. प्रती हेक्टर किंवा ब्रोफ्लॅनिलाइड ३०० ग्रॅम प्रती लिटर SC – ४२–६२ ग्रॅम/हेक्टर या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. • सोयाबीन पिकातील तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीच्या (Spodoptera litura) नियंत्रणासाठी, क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५% SC (१५० मिली/हेक्टर) ची फवारणी करावी.. पर्यायी कीटकनाशक म्हणून, स्पिनोटेरम ११.७ SC (४५० मिली/हेक्टर) किंवा इमामेक्टिन बेंझोएट १.९०% EC (४२५ मिली/हेक्टर) किंवा फ्लुबेंडियामाइड २०% WG (२५०-३०० ग्रॅम/हेक्टर) किंवा फ्लुबेंडियामाइड ३९.३५% w/w एससी (१५० मिली/हेक्टर) किंवा इंडोक्साकार्ब १५.८०% EC (३३३ मिली/हेक्टर) किंवा |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | क्लोरफ्लुआइझ्युरॉन ५.४०% ईसी (५०० मिली/हेक्टर) किंवा नोव्हाल्युरॉन + इंडोक्साकार्ब ४.५०% एससी (८२५-८७५ मिली/हेक्टर) किंवा ब्रोफ्लॅनिलाइड ३०० ग्रॅम/लिटर SC (४२-६२ ग्रॅम/हेक्टर) या कीटकनाशकांची शिफारशीतील प्रमाणात फवारणी करावी. |
| भात | • खरीप धान: रासायनिक खते:- १) जमिनीची तपासणी करुन योग्य प्रमाणात रासायनिक खताचा वापर केल्यास शेती किफायतशीर होते. सर्वसाधारणपणे १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) विभागून द्यावी. • तण व्यवस्थापन:- • १) तण व्यवस्थापनाकरिता आंतरमशागत म्हणुन ज्या धानाची रोवणी १५ x १५ सेमी., २० x २० सेमी., २० x २५ सेमी. अंतरावर केली असेल त्यांनी पॅड्डी पॉवर विडर किंवा कोनो विडरचा वापर करावा. पहिली डवरणीची पाळी रोवणीनंतर पिक चांगले रुजल्यावर २० दिवसांनी दुसरी ४५ दिवसांनी व शक्य झाल्यास तीसरी पाळी ६० दिवसांनी द्यावी. पिकाजवळील राहिलेले व कुजलेले तण मजुरांनी काढुन घ्यावेत. • २) उगवणपश्चात:- बिसपायरीबॅक सोडियम १०% एस.सी. @ ६ ते ७ मिली रोवणीनंतर १० ते १५ दिवसांनी किंवा ब्युटाक्लोर ५०% ई. डब्ल्यु.@ ५० ते ६० मिली रोवणीनंतर १० ते १५ दिवसांनी किंवा अझिमसल्फुरॉन ५०% डी.एफ. @ २.३ ग्रॅम रोवणीनंतर २० ते २५ दिवसांनी प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • किड व रोग व्यवस्थापन:- १) खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी • पिकाची वरचेवर पाहणी करून किडग्रस्त फुटवे मुळासकट काढून नष्ट करावी हे काम हंगामात किमान ३-४ वेळा करावे. • हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. • बुरशीजन्य किटकनाशके जसे मेटारायझीयम, बिव्हेरिया @४० ग्राम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात वापर करावा. • शेतात ५ टक्के किड ग्रस्त फुटवे दिसताच अॅझाडीरेक्टीन ०.१५ टक्के @३० ते ५० मि.ली. किंवा क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही @२६ मि.ली. किंवा कार्बोसल्फान २५ टक्के @१६ मि.ली. किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी किंवा कर्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार @२५ कि./हे. किंवा फिप्रोनील ०.३ टक्के दाणेदार @१६.६७ कि. /हे. याप्रमाणे बांधीमध्ये टाकावे. किंवा शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि. ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी असतांना टाकावे. • रासायनिक किटकनाशक वापरतांना सुरक्षेची सर्व काळजी घेऊनच वापर करावा • २) करपा:- हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा मेंकोझेब ७५% प्रवाही @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ३) कडाकरपा:- कॉपर हैड्रॉकसाईड ५३.८ % टक्के डी एफ @ ३० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन @ १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कपाशी | • ओलिताखालील संकरित कपाशीला ४० किलो नत्र (९० किलो युरिया प्रति हेक्टर) आणि कोरडवाहू संकरित/हिर्सुटम कपाशीला ४५ किलो नत्र (१०० किलो युरिया प्रति हेक्टर) या रासायनिक खताचा पहिला हप्ता वरखत म्हणून द्यावा. रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी, आर्थिक उंबरठा पातळीनुसार अॅसिटामिप्रिड २० एसपी १५ ग्रॅम प्रति हेक्टर किंवा फ्लोनिकमाइड ५०% @ ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • कपाशीतील मावा, तुडतुडे आणि फुलकिडे यांसारख्या रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी, तसेच कपाशीच्या पात्यांवर गुलाबी बोंडअळीच्या माद्यांना अंडी घालण्यापासून अटकाव घालण्यासाठी, निंबोळी अर्क ५ % + कडुलिंबाचे तेल ५ मिली/लिटर किंवा निंबोळी तेलावर आधारित मिश्रण (३०० किंवा १५०० पीपीएम) ५ मिली/लिटर + १.० ग्रॅम धुण्याचा सोडा मिसळून फवारणी करावी. • कपाशीमध्ये दीर्घकाळ पावसाचा खंड असल्यास ०२ किलो १३:००:४५ या विद्राव्य खताची २०० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर या प्रमाणात फवारणी करावी. त्यानंतर ४ ते ५ दिवसाच्या अंतराने कपाशीमध्ये नैसर्गिक पाते व फुलगळ होत असल्यास ती टाळण्यासाठी एनएए म्हणजेच नॅफ्थॅलीन ॲसिटिक ॲसिड ०४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ज्या शेतकरी बांधवांनी कपाशीची लागवड अति घनता लागवड पद्धत (३ बाय १/२ फूट) किंवा कमी अंतर लागवड पद्धतीद्वारे (३ बाय १ फूट) या पद्धतीने केली असल्यास व ४० ते ४५ दिवसाचे असल्यास पाते लागण्याच्या अवस्थेत पिक वाढ रोधक मेपिक्वेट क्लोराईड ५% एएस १ मिली/लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि दुसरी फवारणी १५-२० दिवसांनी १.० मिली/लिटर पाण्यात मिसळून करावी. पावसाचा दीर्घ काळ खंड असल्यास मेपिक्वेट क्लोराईड ची फवारणी टाळावी. • कपाशीमध्ये तुडतुडे व पांढरी माशीच्या निगराणीसाठी व नियंत्रणासाठी एकरी ०८ प्रमाणे पिवळे चिकट सापळे लावावेत. नत्रयुक्त खतांचा अतिरेक टाळावा. तुडतुड्यांनी आर्थिक नुकसानीचा स्तर ओलांडल्यास फ्लोनिकामिड ५० डब्ल्यूजी ४ ग्राम किंवा डीनोटेफुरोन २० एसजी ०३ ग्राम प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. |
| तूर | • अर्धरब्बी तूर (सी-२१) पेरणी सप्टेंबर च्या पहिल्या पंधरवाड्यात करावी. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सूर्य फूल | • अर्धरब्बी सूर्यफुलाची पेरणी सप्टेंबर च्या पहिल्या पंधरवाड्यात करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| टोमॅटो | • टोमॅटोच्या पिकावरील लवकर येणारा करपा या रोगाच्या व्यवस्थापनासाठी रोपे लावण्याच्या एक किंवा दोन दिवस आधी कॉपर ऑक्सीक्लोराईड (३.० ग्रॅम/लिटर) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लिटर) फवारणी करावी. पिकाच्या मुख्य शेतात १०-१५ दिवसांच्या अंतराने किंवा आवश्यकतेनुसार कॉपर ऑक्सीक्लोराईड (३.० ग्रॅम/लिटर) किंवा मॅनकोझेब (२.० ग्रॅम/लिटर) किंवा क्लोरोथॅलोनिल (२.० ग्रॅम/लिटर) किंवा प्रोपिनेब (२.० ग्रॅम/लिटर) किंवा मेटिराम (२.० ग्रॅम/लिटर) किंवा पायराक्लोस्ट्रोबिन + मेटिराम (२.० ग्रॅम/लिटर) किंवा टेबुकोनाझोल ५०% + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५% वजनानुसार (०.६ मिली/लिटर) पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • टोमॅटोच्या पिकावरील उशिरा येणारा करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी मॅंकोझेब (२.० ग्रॅम/लिटर) किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड (३.० ग्रॅम/लिटर) किंवा बोर्डो मिश्रण (१%) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लिटर) किंवा फोसेटाइल-अल (२.० ग्रॅम/लिटर) किंवा डायमेथोमॉर्फ (२.० ग्रॅम/लिटर) किंवा पायराक्लोस्ट्रोबिन + मेटिराम (२.० ग्रॅम/लिटर) यांचे मिश्रण किंवा मेफेनोक्साम + कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लिटर) किंवा मेटालेक्झिल ८% + मॅंकोझेब ६४% (२.० ग्रॅम/लिटर) पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • टोमॅटोच्या पिकामध्ये भुरी रोगाची सुरुवात झाल्यास हेक्साकोनाझोल (१ मिली/लिटर) किंवा डायनोकॅप (१ मिली/लिटर) किंवा पाण्यात विरघळणारे सल्फर (२.५ ग्रॅम/लिटर) किंवा कार्बेंडाझिम (१.० ग्रॅम/लिटर) किंवा ट्रायडाइमेफॉन २५ डब्ल्यूपी (०.४ ग्रॅम/लिटर) किंवा डायफेनकोनाझोल (०.५ मिली/लिटर) किंवा क्रेसोक्सिम मिथाइल ४४.३% एससी (२.० मिली/लिटर) किंवा प्रोपिकोनाझोल २५ ईसी (१.० मिली/लिटर) पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | • मिरचीवरील भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी, रोगाचा प्रादुर्भाव झाल्यापासून १०-१५ दिवसांच्या अंतराने वेटेबल सल्फर (३.० ग्रॅम/लिटर) (फक्त फुलोरा येण्यापूर्वी) किंवा ट्रायडेमॉर्फ (१.० मिली/लिटर) किंवा हेक्साकोनाझोल (०.५ मिली/लिटर) किंवा डायनोकॅप (१ मिली/लिटर) किंवा फ्लुसिलाझोल (०.३ मिली/लिटर) किंवा मायक्लोब्युटानिल (१.० ग्रॅम/लिटर) किंवा इमल्सिफाइड कडुलिंबाचे तेल (१०-१५ मिली/लिटर) फवारणी करावी. |
| संत्रा | • बागेत आवश्यक मशागतीची कामे करावी. झाडाच्या आळ्यातील तण काढून टाकावे आणि ओलितासाठी झाडाभोवती दुहेरी आळे तयार करावे. पहिले आळे खोडापासून एक मीटर आणि दुसरे आळे खोडापासून दोन मीटर अंतरावर केले जाईल याची काळजी घ्यावी. ठिबक सिंचन प्रणाली असल्यास, उप-नळ्या पसरवून गरजेनुसार ओलित करावे. • ०१ वर्ष वयाच्या नागपुरी संत्रा व मोसंबीच्या झाडांना दररोज प्रति झाड ८ लिटर पाणी द्यावे. ५ वर्षांच्या झाडांना ४५ लिटर, ८ वर्षांच्या झाडांना ८७ लिटर आणि १० वर्षे व त्यावरील झाडांना दररोज प्रति झाड १०८ लिटर पाणी द्यावे. लिम्बुच्या झाडाला याच्या निम्मे पाणी द्यावे. • या महिन्यात फळातील रस शोषणाऱ्या पतंगाचा प्रादुर्भाव होतो. या किडीवर नियंत्रण मिळवण्यासाठी, कडुलिंबाचे तेल १० मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि गळलेली सर्व फळे खड्ड्यात गाडून नष्ट करावी. विषारी आमिष ९०० मिली पाण्यात १० मिली मॅलाथिऑन, १०० ग्रॅम गूळ आणि १०० मिली संत्र्याचा रस मिसळून (२५ झाडांसाठी दोन बाटल्या) तयार करावे. बागेत मशागतीची कामे करून स्वच्छ ठेवावी आणि बागेतील तणांचा नायनाट करावा. • लिंबूवर्गीय फळबागेचे धुरीकरण करण्यासाठी, कडुलिंबाची ओलसर पाने व गोवऱ्या मिसळून धूर करावा आणि ती वेगवेगळ्या ठिकाणी ठेवावे. या पद्धतीमुळे फळमाशीला बागेत शिरण्यापासून रोखण्यास मदत होईल. • फळमाशीच्या नियंत्रणासाठी, फळ काढणीच्या ६० दिवस आधीपासून मिथाइल युजेनॉल असलेले नर माश्यांना आकर्षित करणारे सापळे (२० सापळे/हेक्टर) लावावे आणि दर ३० दिवसांनी आमिष/कामगंध बदलावे. • बागेत स्वच्छ ठेवावी आणि दररोज पडलेली फळे खोल खड्ड्यात गाडून टाकावी. • आंबिया बहराच्या (जून-जुलै) फळांचा आकार वाढवण्यासाठी, १०० लिटर पाण्यात १.५ किलो मोनोपोटॅशियम फॉस्फेट किंवा युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेट किंवा |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | डायअमोनियम फॉस्फेट सोबत १.५ ग्रॅम जिबरेलिक ॲसिड (GA3) मिसळून फवारणी करावी. • आंबिया बहारामधील फळगळती थांबवण्यासाठी, १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम कार्बेंडाझिम आणि GA3 किंवा २,४-डी किंवा नॅफ्थलीन ॲसिटिक ॲसिड (NAA) १.५ ग्रॅम मिसळून फवारणी करावी. • लिंबूवर्गीय कोळी आणि नंतर 'लाल्या' रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रति लिटर पाण्यात २ मिली डायकोफॉल किंवा ३ ग्रॅम पाण्यात विरघळणारे सल्फर किंवा १ मिली प्रोपार्गाइट किंवा २ मिली इथिऑन मिसळून फवारणी करावी. |
| पपई | • पपईची ६ आठवड्यांची रोपे २.५ x २.५ मीटर अंतरावर शेतात लावावीत. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • हिवाळी लागवडीसाठी पानकोबी, फुलकोबी, वांगी, टोमॅटो यांचे बी रोपवाटिकेत गादीवाफ्यावर पेरावे. पालक, मेथी, मुळा, गाजर, वाल, तोंडली, लसूण या भाज्यीपालाला पिकांची लागवड करावी. गुलाब, ॲस्टर, मोगरा, गॅलर्डीया या फुलझाडांची व अश्वगंधा, सोनामुखी, पानपिंपळी या औषधी वनस्पतींची शिफारशीनुसार लागवड करावी. |

## हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

| |
|---|
| • मेघगर्जना व विजांच्या कडकडाटामुळे शेतकरी, शेतमजूर तसेच पशुधनाला दुखापत होण्याची किंवा जीवितहानी होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती किंवा खुल्या बाजारात विक्रीसाठी आणलेला शेतमाल भिजून त्याची गुणवत्ता खराब होऊ शकते. |

## परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

| |
|---|
| • कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे स्थानिक शांत व स्वच्छ हवामान परिस्थिती असताना पुढील ३ दिवस सुरु ठेवावी. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा. |

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android**

**application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**